# वाघ अभियांत्रिकीच्या आठ विद्यार्थ्यांना दुबईत संधी

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील ८ विद्यार्थ्यांना दुबई येथील फाईव्ह होल्डिंग या नामांकित कंपनीमध्ये इंटर्नशिप करण्याची संधी मिळालेली आहे. त्यामध्ये कॉम्प्युटर १, मेकॅनिकल २, आयटी २, एमबीए २ आणि ई अँड टी सी १ अशा एकूण ८ विभागातील विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांमध्ये ६ मुले व २ मुलींचा समावेश होय.

इंटर्नशिपचा कालावधी एक महिन्याचा आहे. यावेळी विद्यार्थ्यांना मानधन देखील दिले जाणार आहे. इंटर्नशिप दरम्यान विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्य व जीवन कौशल्याबरोबरच दुबई येथील वर्क कल्चरची अनुभव येणार असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी दिली. इंटर्नशीपसाठी निवड झालेले ८ विद्यार्थी व त्यांचे पालक यांचे कौतुक करण्यासाठी संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची दुबईमध्ये इंटर्नशिपला जाणारी दुसरी बॅच आहे. कोणत्याही महाविद्यालयाने न राबवलेली परदेशी इंटर्नशिप ही संकल्पना के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाने यशस्वी राबवली. तसेच मुलांना परदेशात इंटर्नशिपची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. अधिष्ठाता डॉ. एस. वाय कुटे, विभागप्रमुख डॉ. प्रीती भामरे, डॉ. डी. एम. चांदवडकर, डॉ. एस. एम. कमलापूर, डॉ. पी. बी. कुशारे व डॉ. प्रमोद शहाबादकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, संचालक मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**Gavkari 10-02-2025**